# बृहन्मुंबई महानगरपालिका

## आपत्कालीन व्यवस्थापन विभाग

### पावसाळी परिस्थितीचा अहवाल

### २ ऑगस्ट ते ३ ऑगस्ट २०१९ सकाळी ८.३० ते ८.३० (२४ तास)

१. पाऊस :

| स्थळ | २४ तासांचा पाऊस (मिमी) | २ ऑगस्ट २०१९ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | वार्षिक सरासरी पाऊस (मिमी) | २०१९ पावसाची टक्केवारी | २ ऑगस्ट २०१८ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | २०१८ टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| कुलाबा | ५३.६ | १६००.२ | २२०३ | ७२.६४% | १५३८.७ | ६८.८८% |
| सांताक्रुझ | १३३.९ | २१७०.२ | २५१४ | ८६.३२% | १९३५.७ | ७६.९७% |

२. मनपाच्या स्वयंचलित केंद्रांवर नोंदविण्यात आलेला सरासरी पाऊस :

| विभाग | २४ तासांचा पाऊस (मिमी) | २ ऑगस्ट २०१९ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | शहर व उपनगरातील सरासरी पाऊस (मिमी) | मुंबईत झालेला एकुण सरासरी पाऊस (२३५८) (मिमी) |
|---|---|---|---|---|
| शहर | ४५.६० | १६३६.८९ | ७४.३०% | ७९.२४% |
| पूर्व उपनगरे | ३५.७० | २०६०.१८ | ७८.९२% | |
| पश्चिम उपनगरे | ९३.३० | १९०८.११ | | |

३. तापमान :

| स्थळ | कमाल | किमान |
|---|---|---|
| कुलाबा | २९.० | २४.० |
| सांताक्रुझ | २७.७ | २४.६ |

४. समुद्राची भरती :

| दिनांक | भरतीची वेळ | लाटांची उंची | दिनांक | ओहोटीची वेळ | लाटांची उंची |
|---|---|---|---|---|---|
| ०३.०८.२०१९ | मध्यरात्री १२:५८ | ४.३७ मी. | ०३.०८.२०१९ | सकाळी ६:५३ | ०.२२ मी. |
| **०३.०८.२०१९** | **दुपारी १:४४** | **४.९० मी.** | ०३.०८.२०१९ | सायं. ७:४८ | ०.९४ मी. |
| ०४.०८.२०१९ | मध्यरात्री १:४५ | ४.४२ मी. | ०४.०८.२०१९ | सकाळी ७:३६ | ०.४२ मी. |

५. हवामान अंदाज : कुलाबा वेधशाळेने पुढील २४ तासांकरिता वर्तविलेल्या अंदाजानुसार मुंबई शहर व उपनगरात अधुनमधून पावसाच्या सरी पडत रहातील, काही ठिकाणी जोरदार सरी पडण्याची शक्यता आहे. पुढील ४८ तासांकरिता प्राप्त हवामान अंदाजानुसार शहर व उपनगरात अधुनमधून पावसाच्या सरी पडत रहातील, काही सरी जोरदार ते अतिजोरदार असण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल.

६. **पाणी साचणे** : दिनांक ०३.०८.२०१९ रोजी पहाटे पासून सुरु झालेल्या जोरदार ते अतिजोरदार पावसामुळे व दुपारी १:४४ वा. समुद्रास असणाऱ्या ४.९० मीटरच्या भरतीमुळे शहरात हिंदमाता, एसआयईएस महाविद्यालय वडाळा, सायन रोड नं. २४, गांधी मार्केट पश्चिम उपनगरात कांदिवली, बोरीवली, दहिसर, अंधेरी व पूर्व उपनगरात चेंबुर, घाटकोपर, विद्याविहार या भागातून पाणी साचण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. पाण्याचा निचरा करण्याकरिता महापालिकेच्या संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.

७. **घर पडल्याच्या तक्रारी** : शहरात २, पूर्व उपनगरात ३ व पश्चिम उपनगरात ३ अशा एकूण ८ ठिकाणी घराचा / भिंतीचा भाग पडण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विभागांना कळवून मदतकार्य रवाना करण्यात आले.
१) दिनांक ०२.०८.२०१९ रोजी दुपारी १२:१७ वा. पोलीस नियंत्रण कक्षातून प्राप्त माहितीनुसार चांदीवली फार्म, म्हाडा इमारत क्र. १च्या समोर साकिनाका येथे रिकाम्या असलेल्या घराचा भिंतीचा भाग बाहेरच्या बाजूस पडून त्यात ३ लोक जखमी झाले. उपचारार्थ त्यांना राजावाडी व पॅरामाऊंट रुग्णालयात दाखल करण्यात आले. राजावाडी रुग्णालयातून प्राप्त माहितीनुसार श्री. चंद्रकांत मुन्नाप्पा शेट्टी, वय ४० वर्षे यांना मृत घोषीत करण्यात आले तर पॅरामाउंट मधील संदीप सुरेश कदम, वय ३५ यांना उपचारार्थ दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे, श्री. मुल्ला मकतुम चौधरी, वय ३५ यांना उपचार करुन घरी पाठविण्यात आले.
२) दिनांक ०२.०८.२०१९ रोजी दुपारी २:२५ वा. अग्निशमन दल नियंत्रण कक्षामार्फत प्राप्त माहितीनुसार भगवानदास वाडी, किस्मत सिनेमा, प्रभादेवी या ठिकाणी कंपाउंडची भिंत पडून त्यात दोन महिला अडकल्या होत्या. सदर माहिलांची सुखरुप सुटका करण्यात आली. मार नाही.
३) उपरोक्त तक्रारीपैकी दिनांक ०२.०८.२०१९ रोजी सायंकाळी ०५:४७ वा माहिम सायन लिंक रोड ब्रिज, एस एल रहेजा रुग्णालयाजवळ, माहिम येथील जनता सेवक सोसायटी चाळ ह्या तळमजला अधिक एक मजला असे बांधकाम असलेल्या इमारतीचा काही भाग पडल्याने १ महिला व १ पुरुष जखमी झाले. त्यांना उपचारार्थ बांद्रा भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून दोघांचीही प्रकुती स्थिर आहे. जखमींची नावे : १) मुर्तुजा अली, वय २९ वर्षे २) कौसुम बेगम अली, वय २७

८. **दरड कोसळणे : निरंक**

९. **शॉर्टसर्किट** : शहरात २, पूर्व उपनगरात ३ आणि पश्चिम उपनगरात ४ अशा एकुण ९ ठिकाणी शॉर्टसर्किट होण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विद्युत पुरवठा यंत्रणांना कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

१०. **झाडे/फांद्या पडण्याच्या तक्रारी**: शहरात ६, पूर्व उपनगरात ६ आणि पश्चिम उपनगरात ७ अशा एकुण १९ ठिकाणी झाडे/फांद्या पडण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधीत विभागांना कळविण्यात आल्या आहेत. दिनांक ०२.०८.२०१९ रोजी सायं. ४:४५ वा. सायन रुग्णालयातून प्राप्त माहितीनुसार सायन रुग्णालयाच्या आवारात, आर एम ओ वसाहत येथील झाडाची फांदी पडून श्रीमती शहनाज बानो, वय ४३ ही महिला जखमी झाली. उपचारार्थ त्यांना सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

११. **वाहतुक व्यवस्था** : (आज सकाळी ९:०० वा. प्राप्त माहितीनुसार)

- **पश्चिम रेल्वे** : वाहतुक सुरळीत सुरु आहे
- **मध्य रेल्वे** : वाहतुक १५ ते २० मिनीटे उशिराने सुरु आहे
- **हार्बर रेल्वे** : वाहतुक १५ ते २० मिनीटे उशिराने सुरु आहे

- **बीईएसटी** : खालील ठिकाणी मार्ग वळविण्यात आले आहेत:

| अनु.क्र. | मार्ग बदलण्यात आल्याचे ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १. | मोतीलाल नगर पोस्ट ऑफीस | प्रबोधन क्रीडा मैदान |
| २. | साईनाथ सबवे | मदिना मंजिल |
| ३. | दहिसर सबवे | सुधीर फडके उड्डाणपूल |
| ४. | ओबेरॉय जंक्शन | सिबा कंपनी रोड |
| ५. | दत्ता मंदिर रोड, कांदिवली | लिंक रोड |
| ६. | बाबरेकर नगर, कांदिवली (प) | हिंदुस्थान नाका |
| ७. | श्रीकृष्ण नगर नाला | वाहतूक थांबविण्यात आली |

**१२. विशेष माहिती : निरंक**

===